## महत्वाचे...



### विधीसंघर्षित बालकांची दोघांना मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

एक फिर्यादी ( वय १९ वर्षे, रा. सुतारवाडी पाषाण) आरोपीत एकुण चार विधीसंघर्षित बालक (ताब्यात) मंगळवारी शिवसेना चौक, सुतारवाडी, पाषाण येते यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह नमुद ठिकाणी बसले असताना, नमुद विधीसंघर्षित बालकांनी पुर्वीच्या भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादी व त्यांचे मित्राना शिवीगाळ करुन दगडाने मारहाण केली. फिर्यादी यांचा मित्र सचिन माने यास लोखंडी हत्याराने त्याचे उजव्या हातावर व डोक्यावर वार करुन त्यास जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

### पायी जाणाऱ्या एकाला लुटले

**पुणे । प्रतिनिधी**

येरवडा उत्तम टाउन शिपचे मागील बाजुस, सावंत पेट्रोल पंप कडे जाणारे रस्त्यावर एक पायी जात होते.येथे दुचाकीवरून आलेल्या फिर्यादी जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील पन्नास हजार /- रु.कि.ची सोन्याची चेन व वीस हजार रु.कि.चा. मोबाईल जबरी चोरी करून नेला.

### हॉर्न वाजवली म्हणून मारहाण

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा बु श्रध्दानगर, सोमजी चौक, येथे एकाने दुचाकी फिर्यादी यांचे दुचाकीला आडवी लावुन तुझी हिम्मंत कशी झाली माझे एरीयामध्ये हॉर्न वाजवायची असे म्हणुन शिवीगाळ केली. त्याचेकडील लोखंडी हत्याराने फिर्यादी यांचे डोक्यात व डाव्या हातावर मारहाण करून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.



### महिलेले महिलेचे गंठण खेचुन नेले

**पुणे । प्रतिनिधी**

येरवड्यातील फिर्यादी ह्या वर महिलेस कुत्र्यांना बाहेर खायला टाकु नका असे सांगणेस गेले असताना, महिलेने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, धमकी देवुन फिर्यादी यांचे गळ्यातील ८०,०००/- रुपये कि.चे. सोन्याचे गंठण जबरदस्तीने खेचुन नेले. सहा.पो.निरी. मिथून सावंत अधिक तपस करीत आहेत.

### गणपती मंदिराचे गाभाऱ्यात सोन्याचे मंगळसुत्र चोरले

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे गाभा-यात यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणी देवदर्शनास गेले असताना, कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे गळ्यातील ७५,०००/- रु.कि.चे सोन्याचे मंगळसुत्र चोरुन नेले.

### बस मध्ये चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

फिर्यादी ह्या पीएमपीएल बसने प्रवास करीत असताना सदर बस प्रवासादरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे पर्समधील ठेवलेले ९७०० /-रु. रोख व २,१०,०००/- रु.कि.चे सोन्याचे दागिणे असा एकुण ०२,१९,७००/- रु.कि.चा. ऐवज चोरी करुन नेला.







# अष्टगणेश दर्शन महोत्सव, परदेशी पर्यटकांचा पारंपरिक उत्सवात सहभाग

**पुणे । प्रतिनिधी**

दिशा हॉलिडेज आयोजित व पर्यटन संचालनालय, विभागीय पर्यटन कार्यालय, पुणे यांच्या सहकार्याने पुणे अष्टगणेश दर्शन महोत्सव दिमाखदार पद्धतीने पार पडला.

दिशा हॉलिडेज च्यावतीने युनायटेड किंगडम, ऑस्ट्रेलिया, नॉर्वे, मॅदागास्कर, चिली व मलावी येथील पर्यटकांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. महिला पर्यटकांनी साडी व फेटा तर पुरुषांनी फेटा परिधान करून उत्सवात सहभागी होत पुण्याच्या संस्कृतीत रंगून गेले. त्यांनी गुरुजींसह गणेशाची आरती म्हणत पुण्यातील आठ अष्टगणपती – अखिल मंडई मंडळ, तुळशीबाग, गुरुजी तालीम, तांबडी जोगेश्वरी, केसरीवाडा, कसबा, भाऊसाहेब रंगारी व श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांचे दर्शन घेतले.गणेश दर्शनानंतर त्यांनी अस्सल श्रेयस हॉटेलची मराठी पुरणपोळी थाळी व उकडीचे मोदक यांचा मनमुराद आस्वाद घेतला. या अविस्मरणीय अनुभवाच्या स्मरणार्थ सर्व पर्यटकांना विशेष स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली.

या सोहळ्यास सहाय्यक संचालक (पर्यटन विभाग) श्रीमती शमा पवार, तसेच अखिल मंडई मंडळाचे अध्यक्ष मा.श्री अण्णासाहेब थोरात व दिशा टुरिझमचे मालक श्री. तुषार शिंदे व सौ. सुजाता शिंदे, यांसह मधुरा बोडस, स्नेहल हरपळे, विदुला जवंजाल, विक्रम खन्ना, विश्वास भोर, कृष्णा शिंदे, वेदांत चोरघे, वेदांग महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमामुळे पुण्याचा गणेशोत्सव जागतिक पातळीवर पोहोचविणेस निश्चितच हातभार लागला.

# राष्ट्रीय स्वास्थ अभियान कर्मचाऱ्यांना पुणे मनपात एच.आर.पॉलिसीचा लाभ

## राष्ट्रीय मजदूरच्या लढ्याला यश, राष्ट्रीय मजदूर संघाच्या आंदोलनाचा मोठा विजय

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेत राष्ट्रीय स्वास्थ अभियान (छक्च्) अंतर्गत कार्यरत सुमारे साडेपाचशे कर्मचाऱ्यांना अखेर एच.आर. पॉलिसीचे लाभ मिळणार आहेत. या निर्णयामुळे डॉक्टर्स, नर्सेस, डेटा एन्ट्री ऑपरेटर्स यांसह विविध पदांवरील कर्मचाऱ्यांना ३० दिवसांची रजा, पालकत्व रजा, मातृत्व रजा, दुर्धर आजार झाल्यास तीन महिन्यांची विशेष रजा यांसह अनेक सुविधा मिळणार आहेत.



महाराष्ट्र शासनाने ही पॉलिसी राज्यभर लागू केली होती, मात्र पुणे महानगरपालिकेतील राष्ट्रीय स्वास्थ अभियानातील कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळत नव्हता. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात राष्ट्रीय मजदूर संघ (ठचड) अध्यक्ष तथा कामगार नेते सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने लढा उभारण्यात आला. ऑगस्ट महिन्यात पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या दालनात झालेल्या बैठकीत त्यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाला सकारात्मक प्रतिसाद देत एच.आर. पॉलिसी लागू करण्याचे आश्वासन दिले होते.

आज त्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोराडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक आणि डॉ. गणेश जगदाळे यांनी एच.आर. पॉलिसीचे अधिकृत परिपत्रक राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांना सुपूर्द केले. या प्रसंगी संघटनेचे उपाध्यक्ष सिताराम चव्हाण, सरचिटणीस एस. के. पळसे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वास्थ अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, डॉ. नीना बोराडे व डॉ. मनीषा नाईक यांचे विशेष आभार मानण्यात आले. या निर्णयामुळे साडेपाचशे कर्मचारीवर्गाला मोठा दिलासा मिळाला असून हा राष्ट्रीय मजदूर संघाच्या संघटित ताकदीचा विजय असल्याचे मत व्यक्त होत आहे.


अमृता तेंडुलकर


नरेंद्र पाटील


अभय खुरसाळे

# एनआयपीएमच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये तीघांची निवड

**पुणे । प्रतिनिधी**

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट या मनुष्यबळ व्यवस्थापकांच्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेच्या द्वैवार्षिक निवडणुकीमध्ये पुण्यातील तीन जणांची निवड झाली आहे. या निवडणुकीत पी.आर. बसवराजु यांच्या नेतृत्वातील पॅनलने घवघवीत यश मिळवून सर्वच्या सर्व जागांवरती विजय संपादन केला आहे.

एनआयपीएमच्या पुणे चॅप्टर मधून अमृता तेंडुलकर या राष्ट्रीय खजिनदारपदी निवडणून आल्या असून नरेंद्र पाटील हे पश्चिम विभागाच्या उपाध्यक्षपदी निवडून आले आहेत. तर एनआयपीएम च्या पिंपरी चिंचवड चाकण चॅप्टरचे अभय खुरसाळे हे पश्चिम विभागाचे सदस्य म्हणून राष्ट्रीय कार्यकारिणी मध्ये नेतृत्व करताना दिसणार आहेत. एनआयपीएमच्या २०२५- २७ च्या राष्ट्रीय कार्यकारणीचे अध्यक्ष म्हणून पी.आर. बसवराजु निवडून आले असून उर्वरित कार्यकारणी पुढील प्रमाणे आहे. बी.मुरलीधर राव उपाध्यक्ष, डॉ. विश्वभूषण बेहरा सरचिटणीस, रॉबर्ट कुटीन्हा अतिरिक्त सरचिटणीस, एलेंगो पी. दक्षिण विभाग उपाध्यक्ष, संजय ठाकूर, पूर्व विभाग उपाध्यक्ष, सुहास बिरेवार मध्य विभाग उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पार पाडताना दिसणार आहेत. एनआयपीएम ही संस्था राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एच आर क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासाठी अविरत कार्यरत आहे. या संस्थेत भारतातील विविध औद्योगिक कंपन्यांचे ४० हजारांहून अधिक मनुष्यबळ व्यवस्थापक सभासद आहेत. कोलकाता येथे या संस्थेचे राष्ट्रीय मुख्यालय असून देशभरातील ५६ शाखांमध्ये संस्थेचा कार्यविस्तार आहे.


# पिंपरी चिंचवडमध्ये गणेशोत्सवानिमित्त प्रमुख चौकांमध्ये महापालिकेच्या वतीने सुशोभीकरण

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य शासनाने यावर्षी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, त्यानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण केले आहे.

यामध्ये प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चौक, शगुन चौक, चंद्रमणी कॉलनी सांगवी, तसेच पद्मभूषण वसंतदादा पाटील स्मृतीस्थळ चौक या ठिकाणांचा समावेश आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव काळात शासकीय योजना, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि सांस्कृतिक कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून चौकांचे सुशोभीकरण करण्यात आले असून, येथे आकर्षक सजावट व जनजागृतीमधून नागरिकांना विविध माहिती उपलब्ध करून दिली गेली आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने पिंपरी येथील शगुन चौक तसेच जुनी सांगवी येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील स्मृतीस्थळ चौक येथे 'ऑपरेशन सिंदूर' या शौर्यगाथेवर आधारित सजावट करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्याची प्रतिकृती चिंचवड गावातील चौकात उभारण्यात आली आहे. सांगवीतील चंद्रमणी कॉलनी चौकात युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात सामाविष्ट झालेल्या महाराष्ट्रातील ११ व तामिळनाडू येथील १ अशा १२ किल्ल्यांची माहिती देत सजावट करण्यात आली आहे. तर, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह चौक येथे रायगड किल्ल्याची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख चौकांमध्ये करण्यात आलेली ही आकर्षक सजावट आणि ऐतिहासिक विषयांवर आधारित सुशोभीकरण पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

> "गणेशोत्सव हा सामाजिक,सांस्कृतिक परंपरा वृद्धिंगत करण्यासाठी समाजप्रबोधनाचे माध्यम आहे.या निमित्ताने प्रत्येकजण उत्साही व आनंदीवातावरणात गणरायाची आराधना करीत असतो. राज्य महोत्सवाच्या माध्यमातून विविध ठिकाणी महापालिकेने देखावे सादर केले आहेत. त्यास पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.
> –शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका




# ऊर्जा परिवर्तनामुळे विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील 'रोल मॉडेल' परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्राचे कौतुक

**मुंबई । वृत्तसंस्था**

पारंपरिक कोळसा, नैसर्गिक वायू व तेलावर आधारित विजेऐवजी महाराष्ट्राने सौर ऊर्जेला अधिक प्राधान्य देत ऊर्जा परिवर्तना मध्ये देशात सर्वप्रथम आघाडी घेतली आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विद्युत क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा दिसून येत आहे. या ऊर्जा परिवर्तनासाठी देशाच्या विद्युत क्षेत्रात महाराष्ट्र हे रोल मॉडेल आहे, असे गौरवोद्गार भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांनी गुरूवारी (दि. ४) काढले.

महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्र व विविध सौर ऊर्जा योजनांची माहिती घेण्यासाठी भारतीय परराष्ट्र सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबई येथील महावितरण व महानिर्मितीच्या सांघिक कार्यालयास भेट दिली. यामध्ये योजना पटेल (न्यूयॉर्क), प्रतिभा पारकर राजाराम, पारमिता त्रिपाठी, अन्कन बॅनर्जी, सी. सुगंध राजाराम तसेच बिश्वदीप डे (टान्झानिया), स्मिता पंत (ताश्कंद) यांचा समावेश होता. यावेळी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. राधाकृष्णन बी. यांची प्रमुख उपस्थिती होती.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा विभागाने राज्यातील विजेची वाढती मागणी व पुरवठ्याच्या नियोजनासाठी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. यामध्ये सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे. सोबतच हरित ऊर्जेला प्राधान्य दिल्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे (सीओटू) उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळेल.


भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्राची माहिती घेण्यासाठी महावितरणच्या सांघिक कार्यालयास भेट दिली. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र (महावितरण) व श्री. राधाकृष्णन बी. (महानिर्मिती) आणि संचालक मंडळ उपस्थित होते.

श्री.लोकेश चंद्र म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० अंतर्गत कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी विकेंद्रित सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे सन २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे. जगातील ही सर्वात मोठी विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती योजना आहे. या योजनेमुळे राज्यात ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून ग्रामीण भागात सुमारे ७० हजार रोजगार संधी उपलब्ध होत आहेत. या योजनेमुळे देशामध्ये सर्वाधिक असलेल्या महाराष्ट्रातील ४५ लाख कृषिपंपांना दिवसा व शाश्वत वीजपुरवठा होणार आहे. आतापर्यंत कार्यान्वित झालेल्या १९७२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांमधून ३६९ उपकेंद्रांद्वारे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात येत आहे. सोबतच क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होऊन औद्योगिक व व्यावसायिक वीज दरात घट होण्यास सुरवात झाली आहे, अशी माहिती अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिली.

या बैठकीमध्ये महावितरणचे संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), महापारेषणचे संचालक श्री. सतीश चव्हाण (संचालन), महानिर्मितीचे संचालक श्री. अभय हरणे (प्रकल्प) तसेच कार्यकारी संचालक श्री. दिनेश अग्रवाल, श्री. किशोर पाटील, विशेष कार्य अधिकारी श्री. मंगेश कोहाट व श्री. संतोष सांगळे यांची उपस्थिती होती.